मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | बुधवार ,दि. 07 ऑक्टोबर 2026 | पान-1

# तेजस्विनी दुर्गेंना भाजप युवा मोर्चात मोठी जबाबदारी!

## प्रदेश महामंत्रीपदी नियुक्ती; पिंपरी-चिंचवडच्या युवा नेतृत्वाचा सन्मान

पिंपरी | प्रतिनिधी

**भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश युवा मोर्चाच्या महामंत्रीपदी पिंपरी-चिंचवड शहरातील युवा नेतृत्व तेजस्विनी राजाभाऊ दुर्गे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्ष संघटन, युवकांचे प्रश्न आणि महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात सातत्याने सक्रिय असलेल्या तेजस्विनी दुर्गे यांच्या कार्याची दखल घेत प्रदेश नेतृत्वाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे.**



तेजस्विनी दुर्गे यांच्या नियुक्तीमागे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक आणि विधान परिषद आमदार अमित गोरखे यांच्या विशेष प्रयत्नांची भूमिका असल्याचे सांगण्यात आले. पिंपरी-चिंचवड शहरात पक्ष संघटन मजबूत करण्यासोबतच युवकांना पक्षाच्या मुख्य प्रवाहाशी जोडण्यासाठी तेजस्विनी दुर्गे यांनी सातत्याने केलेल्या कामाची दखल प्रदेश नेतृत्वाने घेतली. त्यांच्या सक्रिय कार्यपद्धतीचा आणि संघटनात्मक योगदानाचा विचार करून प्रदेश युवा मोर्चाच्या महामंत्रीपदाची महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

या नियुक्तीसाठी भाजप पिंपरी-चिंचवड शहर जिल्हाध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप आणि आमदार उमा खापरे यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. स्थानिक पातळीपासून प्रदेश पातळीपर्यंत पक्ष संघटनेत काम करण्याची संधी मिळाल्याने पिंपरी-चिंचवडच्या युवा नेतृत्वाला राज्यस्तरावर नवे व्यासपीठ मिळाले आहे. त्यामुळे दुर्गे यांच्या नियुक्तीकडे शहरातील भाजपच्या युवा संघटनेसाठी महत्त्वपूर्ण घडामोड म्हणून पाहिले जात आहे.

नियुक्तीनंतर प्रतिक्रिया देताना तेजस्विनी राजाभाऊ दुर्गे यांनी पक्ष नेतृत्वाने आपल्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल मनापासून कृतज्ञता व्यक्त केली. भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या प्रदेश महामंत्रीपदी काम करण्याची संधी मिळणे ही आपल्यासाठी मोठी जबाबदारी असून, ही संधी केवळ प्रदेश नेतृत्व आणि स्थानिक नेतृत्वाने दाखवलेल्या विश्वासामुळे मिळाली असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी आपल्या राजकीय आणि सामाजिक वाटचालीत कायम मार्गदर्शन करणारे त्यांचे वडील तथा माजी नगरसेवक राजाभाऊ दुर्गे यांचे विशेष आभार मानले. तसेच त्यांच्या राजकीय वाटचालीत आधारस्तंभ म्हणून साथ देणारे आमदार अमित गोरखे यांचेही त्यांनी आभार व्यक्त केले. पक्षातील वरिष्ठ नेत्यांचे मार्गदर्शन, सहकाऱ्यांची साथ आणि कार्यकर्त्यांचा विश्वास या बळावर आगामी काळात अधिक जोमाने काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

युवकांच्या प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडणे, अधिकाधिक युवकांना भाजपच्या विचारधारेशी जोडणे, पक्षाची संघटनात्मक ताकद वाढवणे तसेच महिला नेतृत्वाला प्रोत्साहन देण्यासाठी काम करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. पक्षाने सोपवलेली जबाबदारी ही केवळ पद नसून मोठी जबाबदारी आहे, याची जाणीव असून त्या जबाबदारीला पूर्ण न्याय देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

"पक्षाने माझ्यावर टाकलेला विश्वास मी सार्थ ठरवेन. मला मिळालेल्या या संधीचे निश्चित सोने करून दाखवेन," अशी ग्वाही तेजस्विनी दुर्गे यांनी दिली. प्रदेश युवा मोर्चाच्या माध्यमातून पक्षाची ध्येयधोरणे युवकांपर्यंत पोहोचविण्यासोबतच संघटनेच्या विस्तारासाठी आणि युवा कार्यकर्त्यांना अधिक सक्षम करण्यासाठी प्रभावीपणे काम करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड शहरातील युवा नेतृत्वाला भाजपच्या प्रदेश संघटनेत महत्त्वाची जबाबदारी मिळाल्याने स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. तेजस्विनी दुर्गे यांच्या नियुक्तीमुळे शहरातील भाजपच्या युवा संघटनेला प्रदेश पातळीवर प्रतिनिधित्व मिळाले असून, आगामी काळात युवकांच्या माध्यमातून पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यासाठी त्यांच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे.

दुर्गे यांच्या नियुक्तीचे शहरातील भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून स्वागत करण्यात येत असून, त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. प्रदेश महामंत्री म्हणून मिळालेली ही जबाबदारी त्यांच्या राजकीय वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, या माध्यमातून पिंपरी-चिंचवडच्या युवा नेतृत्वाचा राज्यस्तरावर ठसा उमटण्याची संधी निर्माण झाली आहे.

# लोणावळ्यात ८३ वर्षीय आजोबांचा परवानाधारक रायफलमधून गोळीबार

पिंपरी | प्रतिनिधी

**प्रॉपर्टीच्या वादातून ८३ वर्षीय आजोबांनी नातवाची गोळी झाडून हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार लोणावळ्यातील भुशी गावात उघडकीस आला आहे. अभय माणिक मराठे (वय ३३) असे मृत तरुणाचे नाव आहे. सुरुवातीला रायफल साफ करताना अचानक गोळी सुटून अपघाती मृत्यू झाल्याची नोंद करण्यात आली होती. मात्र शवविच्छेदन आणि पोलिस तपासात हा अपघात नसून खून असल्याचे समोर आले.**





मोतीराम मराठे (वय ८३) यांनी त्यांच्या परवानाधारक रायफलमधून नातू अभय मराठे यांच्या छातीत गोळी झाडल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले. प्रॉपर्टीच्या व्यवहारावरून दोघांमध्ये आधीपासून वाद सुरू होता. ५ ऑक्टोबर रोजीही याच कारणावरून त्यांच्यात वाद झाला. याच वादातून संतापलेल्या मोतीराम यांनी रायफलमधून गोळी झाडल्याचे पोलिसांनी सांगितले. गोळीबारानंतर अभय गंभीर जखमी झाले आणि उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

घटनेनंतर सुरुवातीला अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मात्र शवविच्छेदनादरम्यान पोलिसांना संशय आल्याने तपासाची दिशा बदलली. हॉटेलमधील वेटर आणि इतर प्रत्यक्षदर्शींची चौकशी केल्यानंतर हा अपघात नसून नियोजित गोळीबार असल्याचे समोर आले. तसेच घटनेनंतर पुरावे नष्ट करणे आणि मोतीराम यांना वाचवण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी कुटुंबातील आणखी पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मोतीराम मराठे यांच्याकडे दोन परवानाधारक रायफल असून त्यांना शिकारीची आवड असल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यांनी १९७० आणि १९८०च्या दशकात या रायफल खरेदी केल्या होत्या. यापैकी एका रायफलमधूनच अभय यांच्यावर गोळीबार करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले.

# बालगीतांच्या मैफलीत बच्चेकंपनी रमली!

## 'अभिजात मराठी भाषा सप्ताहा'त आचार्य अत्रे रंगमंदिरात रंगला बहारदार कार्यक्रम

**पिंपरी | प्रतिनिधी**

**मराठी भाषेचे संवर्धन, प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित 'अभिजात मराठी भाषा सप्ताहा' अंतर्गत आचार्य अत्रे रंगमंदिरात रंगलेल्या बहारदार बालगीतांच्या मैफलीला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध प्राणी-पक्षी, गणपती उत्सवातील आठवणी आणि बालविश्वातील निरागस अनुभवांवर आधारित गाणी सादर होताच बच्चेकंपनीने टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.**




संत तुकाराम नगर येथील आचार्य अत्रे रंगमंदिरात हा कार्यक्रम पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड यांच्या अधिपत्याखाली आयोजित करण्यात आला. सुप्रसिद्ध गीतकार, गायिका आणि संगीतकार भारती न्यायाधीश यांच्या बालगीतांचा हा विशेष कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.

विजय न्यायाधीश यांच्या संकल्पनेतून सादर झालेल्या कार्यक्रमाची सुरुवात 'या हो या, या हो या गणपती बाप्पा लवकर या' या गीताने करण्यात आली. त्यानंतर भारती न्यायाधीश यांच्यासह बालकलावंत ध्वनी गुप्ता, ईरा चायनाखवा आणि शौर्यवी मांडवगडे यांनी विविध बालगीते सादर केली. त्यांच्या सादरीकरणाला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत कार्यक्रमाला सुरुवातीपासूनच रंगत आली.

'आमच्या घरची मनीमाऊ', 'कावळेदादा काव काव', 'झुक झुक झुक निघाली जंगलक्वीन', 'हत्तुल्या रे हत्तुल्या' आणि 'कोंबडीने शिकविले पिल्लाला' यांसारख्या गीतांनी विद्यार्थ्यांचे विशेष लक्ष वेधून घेतले. कावळेदादासाठी चिमणीने आणलेला पाव, दुध पिणारी मनीमाऊ, प्राण्यांना घेऊन जाणारी झुकझुक गाडी, डुलत चालणारा हत्तुल्या आणि कोंबडीच्या पिल्लाला दिलेली शिकवण अशा गमतीदार आणि कल्पनारम्य आशयाने भरलेल्या गीतांमुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला.

बालगीतांमधून केवळ मनोरंजन न करता मराठी भाषेची गोडी, शब्दांची ओळख आणि मातृभाषेचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात आला. पारंपरिक बालगीतांबरोबरच संगीत, अभिनय आणि सादरीकरणाची सांगड घातल्यामुळे विद्यार्थ्यांनीही कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रम जसजसा पुढे सरकत गेला तसतशी विद्यार्थ्यांची उत्सुकता आणि उत्साह वाढत गेला. विविध गीतांवर विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद देत कलाकारांचा उत्साह वाढवला. अखेरीस 'डुबी डुबी डम डम' या गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांना मनोरंजनासोबतच मराठी भाषेतील बालसाहित्य आणि गीतांची ओळख झाली. त्यामुळे 'अभिजात मराठी भाषा सप्ताहा'तील हा बालगीतांचा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी आनंददायी आणि संस्मरणीय ठरला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महापालिकेचे ग्रंथालय समन्वयक प्रविण चाबुकस्वार, प्रशासकीय अधिकारी दत्तात्रय सूर्यवंशी, तसेच किशोर केदारी आणि साळवे यांचे सहकार्य लाभले.

# सात मजली इमारत उभी राहिली, मग महापालिकेला जाग!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या 'ड' क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील प्रभाग क्रमांक २९, पिंपळे गुरव येथील सृष्टी चौक परिसरातील अनधिकृत बांधकामावर अखेर कारवाई सुरू करण्यात आली आहे. मात्र, तब्बल सात मजली इमारत उभी राहेपर्यंत महापालिका प्रशासन नेमके काय करत होते? असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.**



बांधकाम सुरू असतानाच संबंधित बीट निरीक्षक, कनिष्ठ अभियंता, उपअभियंता आणि कार्यकारी अभियंता यांच्या निदर्शनास हे बांधकाम आले नव्हते का? बांधकामाची सुरुवात झाल्यापासून त्यावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणेची असताना, तब्बल सात मजली इमारत उभी राहेपर्यंत प्रशासनाला याची माहिती मिळाली नाही का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. विशेष म्हणजे, बांधकामाचा आकार दिवसेंदिवस वाढत असताना त्याची पाहणी, नोंद आणि आवश्यक ती प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती का, याचीही चौकशी होणे गरजेचे असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

एखादे अनधिकृत बांधकाम सुरू झाल्यानंतर सुरुवातीच्या टप्प्यातच त्यावर कारवाई करणे अपेक्षित असते. मात्र, बांधकाम पूर्णत्वाच्या दिशेने गेल्यानंतर नोटिसा बजावणे, पंचनामा करणे आणि त्यानंतर पाडकामाची कारवाई सुरू करणे, अशीच पद्धत प्रशासनाकडून अवलंबली जात आहे का, असा प्रश्न आता उपस्थित झाला आहे. अनधिकृत बांधकाम उभे राहिल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा ते उभेच राहू नये यासाठी महापालिकेची यंत्रणा कितपत सक्रिय आहे, याचे उत्तर प्रशासनाला द्यावे लागणार आहे.

विशेष म्हणजे, शहरातील प्रत्येक भागात बीट निरीक्षक आणि संबंधित अभियंत्यांमार्फत बांधकामांवर देखरेख ठेवली जाते. नव्याने सुरू होणाऱ्या बांधकामांची माहिती घेणे, बांधकाम परवानगीची तपासणी करणे आणि नियमबाह्य बांधकाम आढळल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देणे, ही संबंधित यंत्रणेची जबाबदारी आहे. असे असताना पिंपळे गुरवमधील हे बांधकाम सात मजल्यांपर्यंत पोहोचेपर्यंत प्रशासनाच्या लक्षात आले नसेल, तर महापालिकेची बीट निरीक्षण आणि देखरेख यंत्रणा नेमकी कशी काम करते? असा सवाल नागरिक करत आहेत.

सात मजली इमारत उभी राहिल्यानंतर कारवाईला सुरुवात झाल्याने महापालिकेच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. बांधकामाच्या प्रत्येक टप्प्यावर संबंधित अधिकाऱ्यांनी पाहणी केली होती का? पाहणी केली असल्यास त्यावेळी काय नोंद करण्यात आली? वरिष्ठ अधिकाऱ्यांना अहवाल देण्यात आला होता का? कारवाईची शिफारस करण्यात आली होती का? याची माहिती सार्वजनिक होणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे. या सर्व बाबींची चौकशी झाल्यास या बांधकामाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष नेमक्या कोणत्या टप्प्यावर झाले, हे स्पष्ट होऊ शकते.

दरम्यान, पिंपळे गुरव परिसरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे सुरू असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. काही ठिकाणी लहान-मोठ्या बांधकामांवर तातडीने कारवाई केली जाते, तर काही मोठ्या आणि अनेक मजली बांधकामांकडे दीर्घकाळ दुर्लक्ष होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे महापालिकेच्या कारवाईची पद्धत सर्व बांधकामांसाठी समान आहे का, की कारवाईमध्ये काही ठिकाणी वेगळे निकष वापरले जातात, याचीही तपासणी करण्याची मागणी जोर धरत आहे.

बांधकाम सुरू असतानाच कारवाई का झाली नाही? सात मजली इमारत उभी राहेपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांना याची माहिती कशी मिळाली नाही? बांधकामाच्या प्रत्येक टप्प्यावर पाहणी झाली होती का? पाहणी झाली असेल तर त्याची नोंद कुठे आहे? वरिष्ठ अधिकाऱ्यांना याची माहिती देण्यात आली होती का? या प्रश्नांची उत्तरे आता नागरिकांकडून मागितली जात आहेत.

# मिशन वॉन्टेडमध्ये 'अँटी गुंडा स्कॉड' अव्वल!

## १३२ गुणांसह पहिला क्रमांक; १५ दिवसांत २४७ वॉन्टेड आरोपी पोलिसांच्या जाळ्यात

**पुणे | प्रतिनिधी**

**वॉन्टेड आणि फरारी आरोपींच्या मुसक्या आवळण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी राबविलेल्या 'मिशन वॉन्टेड' या १५ दिवसांच्या विशेष मोहिमेला मोठे यश मिळाले आहे. पोलीस ठाणे आणि गुन्हे शाखेच्या पथकांनी केलेल्या धडक कारवाईत तब्बल २४७ आरोपींना पकडण्यात यश मिळाले. गुन्हे शाखेअंतर्गत घेण्यात आलेल्या कामगिरीच्या स्पर्धेत अँटी गुंडा स्कॉडने १३२ गुणांसह अव्वल स्थान पटकावले आहे.**



पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत विविध गुन्ह्यांमध्ये वॉन्टेड असलेल्या आरोपींची संख्या मोठी असल्याने २७ जुलै ते १२ ऑगस्ट या कालावधीत ही विशेष मोहीम राबविण्यात आली. मोहिमेपूर्वी पोलिसांच्या रडारवर २ हजार ६३५ पाहिजे आरोपी आणि ३२ फरारी, असे एकूण २ हजार ६६७ आरोपी होते. पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या आदेशानुसार पोलीस ठाणे आणि गुन्हे शाखेची स्वतंत्र पथके तयार करून आरोपींचा शोध सुरू करण्यात आला.

आरोपींचे जुने पत्ते, नातेवाईक, मित्रपरिवार आणि संपर्कातील व्यक्तींची माहिती घेण्यात आली. उपलब्ध तांत्रिक व इतर माहितीच्या आधारे आरोपींच्या संभाव्य ठिकाणांवर छापे टाकण्यात आले. अनेक दिवसांपासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या आरोपींचा शोध घेण्यासाठी पथकांनी शहराबाहेरही मोहीम राबवली.

या विशेष कारवाईत पोलीस ठाण्यांनी १४०, तर गुन्हे शाखेने १०७ आरोपींना पकडले. याशिवाय मृत्यू, अटकपूर्व कारवाई, दुबार नावे किंवा इतर कारणांमुळे ७९ प्रकरणे कमी झाली. त्यामुळे एकूण ३२६ प्रकरणांचा निपटारा झाला असून, अद्याप २ हजार ३४१ आरोपींचा शोध बाकी असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे.

गुन्हे शाखेच्या कामगिरीत अँटी गुंडा स्कॉडने सर्वाधिक गुण मिळवत अव्वल स्थान पटकावले. पथकाने मोक्का प्रकरणातील सहा, गंभीर गुन्ह्यांतील नऊ आणि इतर गुन्ह्यांतील सहा, अशा एकूण २१ आरोपींना पकडले. या कामगिरीच्या आधारे पथकाला तब्बल १३२ गुण मिळाले.

विशेष म्हणजे, आरोपी पकडण्याच्या संख्येत गुन्हे शाखेचे युनिट तीन आघाडीवर होते. युनिट तीनने तब्बल २४ आरोपींना पकडले; मात्र गुन्ह्यांचे स्वरूप आणि त्यानुसार निश्चित करण्यात आलेल्या गुणांकन पद्धतीमुळे अँटी गुंडा स्कॉडने बाजी मारली. युनिट तीनच्या कारवाईत मोक्का प्रकरणातील एक, गंभीर गुन्ह्यांतील आठ आणि इतर गुन्ह्यांतील १५ आरोपींचा समावेश होता.

'मिशन वॉन्टेड'मुळे अनेक दिवसांपासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या आरोपींच्या हालचालींवर मोठ्या प्रमाणात मर्यादा आल्या. जुन्या गुन्ह्यांच्या फायली पुन्हा उघडून आरोपींचा माग काढण्यात आल्याने फरारी आरोपींमध्ये पोलिसांची धास्ती निर्माण झाली. काही आरोपींनी आपली ठिकाणे बदलल्याची माहितीही तपासात समोर आली.

अद्याप मोठ्या संख्येने वॉन्टेड आरोपी पोलिसांच्या रडारवर असल्याने 'मिशन वॉन्टेड'ची कारवाई पुढेही सुरू ठेवण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

पोलीस ठाण्यांच्या कामगिरीत हिंजवडी पोलीस ठाण्याने १९ आरोपी पकडून ८४ गुणांसह पहिला क्रमांक मिळविला. पिंपरी पोलीस ठाण्याने १२ आरोपी पकडून ५७ गुणांसह दुसरा, तर सांगवीने १० आरोपी पकडून ५४ गुणांसह तिसरा क्रमांक मिळविला.

त्यानंतर संत तुकारामनगर आणि वाकड यांनी प्रत्येकी ४८, निगडीने ४२, चिखलीने ३७, तळेगाव दाभाडेने ३३, चाकण उत्तरने ३० आणि आळंदी पोलीस ठाण्याने २७ गुण मिळविले

गुन्हे शाखेच्या पथकांमध्ये अँटी गुंडा स्कॉड १३२ गुणांसह पहिल्या क्रमांकावर राहिले. युनिट तीनने १०३ गुणांसह दुसरा, तर युनिट एक आणि युनिट दोनने प्रत्येकी ८४ गुणांसह संयुक्त तिसरा क्रमांक मिळविला. युनिट चारला ६९, मालमत्ता/दरोडा विरोधी पथकाला २४, अमली पदार्थ विरोधी पथकाला १८, तर खंडणी विरोधी पथकाला तीन गुण मिळाले.

'मिशन वॉन्टेड'दरम्यान अँटी गुंडा स्कॉडने शहराच्या सीमा ओलांडून थेट पाच राज्यांत कारवाई करत मोक्का प्रकरणातील आरोपींचा शोध घेतला. हरियाणातून सुभाष बिश्नोई, उत्तर प्रदेशातून वैभव नागझरकर, तेलंगणातून अफजल शहा, कर्नाटकातून अंकुश सूर्यवंशी, तर बिहारमधून प्रकाश राम आणि चंदन राम यांना पथकाने ताब्यात घेतले.

# औद्योगिक क्रीडा संघटनेच्या कॅरम स्पर्धेत २२९ खेळाडूंची दमदार उपस्थिती!

**पुणे | प्रतिनिधी**

**औद्योगिक क्रीडा संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ६३व्या कॅरम स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. चिंचवड येथील एसकेएफ बेअरिंग इंडिया एम्प्लॉइज युनियन हॉलमध्ये रविवारी झालेल्या या स्पर्धेत पिंपरी-चिंचवडसह परिसरातील नामांकित औद्योगिक कंपन्यांमधील तब्बल २२९ महिला व पुरुष खेळाडूंनी सहभाग नोंदवला. विशेष म्हणजे, यंदाच्या स्पर्धेत प्रथमच औद्योगिक क्षेत्रातून निवृत्त झालेल्या कर्मचारी व कामगारांसाठी स्वतंत्र गट ठेवण्यात आल्याने स्पर्धेला वेगळे महत्त्व प्राप्त झाले.**



या स्पर्धेचे आयोजन एसकेएफ इंडिया, चिंचवड यांच्या वतीने करण्यात आले होते. एसकेएफ, पीसीएमसी, बजाज ऑटो, जेसीबी इंडिया, महिंद्रा अँड महिंद्रा, टाटा मोटर्स, टीसीएस, टेक महिंद्रा, सँडविक एशिया, भारत फोर्ज, इन्फोसिस, टेट्रापॅक, थरमॅक्स, मर्सिडीज यांसह तब्बल ४७ नामांकित कंपन्यांतील खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील क्रीडा संस्कृतीला चालना देणारे मोठे व्यासपीठ म्हणून या स्पर्धेकडे पाहिले जात आहे.

स्पर्धेत पुरुष एकेरी, पुरुष दुहेरी, महिला एकेरी आणि महिला दुहेरी अशा चार प्रमुख गटांमध्ये सामने घेण्यात आले. त्याचबरोबर यंदा प्रथमच निवृत्त कर्मचारी व कामगारांसाठी स्वतंत्र एकेरी गटाची निर्मिती करण्यात आली. त्यामुळे सेवेत असलेल्या खेळाडूंसोबतच औद्योगिक क्षेत्रात दीर्घकाळ योगदान देऊन निवृत्त झालेल्या खेळाडूंनाही पुन्हा स्पर्धात्मक क्रीडा व्यासपीठ उपलब्ध झाले.

दिवसभर रंगलेल्या सामन्यांमध्ये विविध कंपन्यांच्या खेळाडूंनी आपले कौशल्य पणाला लावत चुरशीच्या लढती दिल्या. अचूक स्ट्राईक, नियोजनबद्ध खेळ आणि शेवटच्या क्षणापर्यंत रंगलेल्या सामन्यांमुळे स्पर्धेतील वातावरण उत्साहपूर्ण राहिले. महिला आणि पुरुष खेळाडूंनीही उत्कृष्ट कामगिरी करत आपल्या कंपन्यांचे प्रतिनिधित्व केले.

पारितोषिक वितरण समारंभाच्या प्रारंभी प्रदीप वाघ यांनी प्रास्ताविक केले. नरेंद्र कदम यांनी औद्योगिक क्रीडा संघटनेच्या आतापर्यंतच्या वाटचालीची माहिती उपस्थितांना दिली. संघटनेचे सचिव वसंत ठोंबरे यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करत औद्योगिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी क्रीडा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. यंदाच्या स्पर्धेतील विशेष आकर्षण ठरलेल्या निवृत्त कर्मचारी एकेरी गटात सूर्यकांत केसरकर यांनी विजेतेपद पटकावले, तर गिरीश जोशी यांनी उपविजेतेपद मिळविले. प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या या गटाला निवृत्त कर्मचारी व कामगारांकडूनही चांगला प्रतिसाद मिळाला.

महिला एकेरी गटात टेट्रापॅकच्या निशा पाटील यांनी विजेतेपद मिळविले, तर सँडविक एशियाच्या स्मिता घाग उपविजेत्या ठरल्या. महिला दुहेरी गटातही टेट्रापॅकच्या निशा पाटील आणि निशा राठी यांनी विजेतेपद पटकावले. प्राज इंडस्ट्रीजच्या सुकन्या भावसार आणि श्रुतिका जाधव यांनी उपविजेतेपद मिळविले.

# MPSC आंदोलनावर उच्च न्यायालयाची नोटीस!

## आंदोलन आयोजकांना नोटीस; आंदोलकांसाठी निश्चित जागेची मागणी!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पुण्यात गेल्या सहा दिवसांपासून सुरू असलेल्या एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला आता न्यायालयीन वळण मिळाले आहे. आंदोलनामुळे शहरातील वाहतूक आणि नागरिकांना होणाऱ्या त्रासाचा मुद्दा उपस्थित करत काही पुणेकर नागरिकांनी थेट मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. या याचिकेची दखल घेत उच्च न्यायालयाने राज्य सरकार, पुणे पोलिस आणि आंदोलनाच्या आयोजकांना नोटीस बजावली आहे. त्यामुळे बुधवारी, ७ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**



पुण्यात सुरू असलेल्या एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनासाठी आंदोलकांना निश्चित अशी स्वतंत्र जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी याचिकाकर्त्यांकडून करण्यात आली आहे. सध्या ज्या ठिकाणी आंदोलन सुरू आहे, ती जागा तातडीने रिकामी करावी, आंदोलकांना आंदोलनासाठी निश्चित जागा द्यावी आणि आंदोलनाच्या आयोजकांवर गुन्हा दाखल करावा, अशा विविध मागण्या याचिकेत करण्यात आल्या आहेत.

या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारसह पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांना नोटीस बजावली आहे. त्याचबरोबर आंदोलनाचे प्रमुख आयोजक प्रमोद पाटील, नितीन आंधळे आणि चेतन वाघज यांनाही न्यायालयाने नोटीस बजावली आहे. संबंधित सर्व पक्षांना आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात आली असून, त्यानंतर न्यायालय या प्रकरणावर पुढील निर्देश देण्याची शक्यता आहे.

एमपीएससीच्या विविध मागण्यांसाठी पुण्यात १ ऑक्टोबरपासून विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. दिवसेंदिवस आंदोलनाची तीव्रता वाढत असून, मोठ्या संख्येने विद्यार्थी आंदोलनस्थळी उपस्थित राहत आहेत. आंदोलनाला विविध राजकीय पक्ष आणि नेत्यांकडूनही पाठिंबा मिळत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते रोहित पवार आणि काँग्रेसचे आमदार विश्वजित कदम यांनी आंदोलनाला पाठिंबा देत आंदोलनस्थळी सहभाग नोंदवला. सोमवारी रात्री काँग्रेसचे काही आमदारही आंदोलनात सहभागी झाले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला राजकीय पाठिंबाही मिळत असल्याचे चित्र आहे.

सोमवारी रात्री महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनीही आंदोलनस्थळी भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी राज्य सरकारवर टीका करत विद्यार्थ्यांचे प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची मागणी केली. त्यामुळे आंदोलनाला आणखी राजकीय महत्त्व प्राप्त झाले.

दरम्यान, मंगळवारी आंदोलनाचा सहावा दिवस होता. एकीकडे विद्यार्थी आपल्या मागण्यांवर ठाम असताना दुसरीकडे आंदोलनामुळे होणारी वाहतूक कोंडी, नागरिकांची गैरसोय आणि सार्वजनिक ठिकाणाच्या वापराबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. याच पार्श्वभूमीवर पुणेकर नागरिकांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेमुळे आंदोलनासमोरील कायदेशीर आव्हान वाढले आहे.

मुंबई उच्च न्यायालयात बुधवार, ७ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वाजता या प्रकरणाची सुनावणी होणार आहे. आंदोलकांना निश्चित जागा देण्याची मागणी, आंदोलनाची सद्यस्थिती, नागरिकांची होणारी गैरसोय आणि आयोजकांची भूमिका याबाबत न्यायालय काय निर्देश देते, याकडे पुणेकरांसह आंदोलनात सहभागी विद्यार्थ्यांचेही लक्ष लागले आहे.

एकीकडे एमपीएससी विद्यार्थ्यांचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी जोर धरत असताना, दुसरीकडे आंदोलनाच्या ठिकाणावरून थेट उच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्याने या आंदोलनाला आता कायदेशीर वळण मिळाले आहे. बुधवारी होणाऱ्या सुनावणीनंतर आंदोलनाबाबत पुढील दिशा स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

# पुरंदर विमानतळासाठी ७६ टक्के जमीन ताब्यात!

» पुणे | प्रतिनिधी

**पुरंदर तालुक्यात प्रस्तावित असलेल्या छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादन प्रक्रियेला आता वेग आला आहे. विमानतळासाठी आवश्यक असलेल्या एकूण १ हजार २१६ हेक्टर जमिनीपैकी तब्बल ९८० हेक्टर, म्हणजेच ७६ टक्के जमीन जिल्हा प्रशासनाच्या ताब्यात आली आहे. आतापर्यंत सुमारे ९६ टक्के शेतकऱ्यांनी जमीन देण्यास संमती दर्शवली असून, उर्वरित शेतकऱ्यांना संमती देण्यासाठी १० ऑक्टोबरपर्यंतची अंतिम मुदत देण्यात आली आहे. ही मुदत संपल्यानंतर संमती न देणाऱ्या शेतकऱ्यांची जमीन सक्तीने संपादित करण्याची भूमिका प्रशासनाने घेतली आहे.**



पुरंदर तालुक्यातील वनपुरी, कुंभारवळण, एखतपूर, खानवडी, पारगाव, उदाचीवाडी आणि मुंजवडी या सात गावांमधील जमीन विमानतळ प्रकल्पासाठी संपादित करण्यात येत आहे. या सात गावांमधून एकूण १ हजार २१६ हेक्टर जमीन संपादित करण्याचे नियोजन आहे. त्यापैकी आतापर्यंत १ हजार १६७ हेक्टर जमिनीला शेतकऱ्यांची संमती मिळाली आहे. मात्र, या संमतीनंतरही सुमारे ४० हेक्टर जमीन देण्यास काही शेतकऱ्यांचा विरोध कायम असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

विमानतळ प्रकल्पासाठी बहुतांश शेतकऱ्यांनी जमीन देण्यास संमती दिल्याने भूसंपादनाचा मोठा टप्पा पूर्ण झाला आहे. मात्र, अद्यापही काही शेतकरी जमीन देण्यास तयार नसल्याने प्रशासनासमोर हा प्रश्न कायम आहे. त्यामुळे उर्वरित शेतकऱ्यांना आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी १० ऑक्टोबरपर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

या मुदतीत संमती न देणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनीचे कायद्यानुसार सक्तीने भूसंपादन करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत पुरंदर विमानतळाच्या भूसंपादन प्रक्रियेला आणखी वेग येण्याची शक्यता आहे.

दरम्यान, प्रस्तावित विमानतळासाठी निवडण्यात आलेली जागा योग्य नसल्याचा दावा करत काही शेतकऱ्यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. विमानतळ प्रकल्पाला विरोध करणाऱ्या गटाकडून प्रकल्पाच्या जागेवर तसेच भूसंपादन प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित करण्यात आले होते.

या याचिकेवर सुनावणी झाल्यानंतर उच्च न्यायालयाने विमानतळविरोधी गटाची याचिका फेटाळून लावली आहे. त्यामुळे विमानतळ प्रकल्पाच्या पुढील प्रक्रियेसमोरील महत्त्वाचा कायदेशीर अडथळा दूर झाल्याचे मानले जात आहे. न्यायालयीन प्रक्रियेमुळे काही काळ रखडलेल्या प्रकल्पाच्या भूसंपादनाला आता प्रशासनाकडून गती देण्यात येत आहे.राज्य सरकारने विमानतळासाठी होणाऱ्या भूसंपादनात शेतकऱ्यांना प्रतिएकर १ कोटी ६१ लाख रुपये मोबदला निश्चित केला आहे. त्याशिवाय शेतजमिनीवरील झाडे, बागा, विहिरी आणि घरांसाठी स्वतंत्र मोबदल्याचे पॅकेज देण्यात येत आहे. त्यामुळे जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या मालमत्तेच्या स्वरूपानुसार अतिरिक्त भरपाईही दिली जात आहे.

आतापर्यंत जिल्हा प्रशासनाने भूसंपादनाच्या मोबदल्यापोटी शेतकऱ्यांना तब्बल ३ हजार ८०० कोटी रुपये वितरित केले आहेत. मोठ्या प्रमाणात मोबदला वाटप झाल्याने भूसंपादन प्रक्रियेतील आर्थिक टप्पाही पुढे सरकला आहे.पुरंदर विमानतळासाठी आवश्यक जमिनीपैकी मोठा हिस्सा प्रशासनाच्या ताब्यात आल्याने प्रकल्प आता निर्णायक टप्प्यात पोहोचला आहे.